महाराष्ट्र शासन
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे – ४११ ००१
फोन नं.: ०२० -२६३६ ०९४१, २६३६ २०७१
Email Id: trti.mah@nic.in
website: trti.maharashtra.gov.in

**क्रमांक- संशोधन-२०२४/प्र.क्र.९/का-४/**2363 **दिनांक: १० ऑगस्ट, २०२४**

**विषय:** UGC नियमानुसार सुधारित दराने पीएचडी अधिछात्रवृत्ती योजना लागू करणेबाबत.

**संदर्भ:**- १. आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.अछावृ-२०२२/प्र.क्र.१३४/का.१९ दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३.
२. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक सान्यावि-२०२४/प्र.क्र ७७/ बांधकामे दिनांक २५ जुलै, २०२४
३. महाराष्ट्र शासनाचे पत्र क्रमांक अछावृ-२०२२/प्र.क्र.१३४/का.१९ दिनांक ०९/०७/२०२४.

## परिपत्रक

संदर्भ क्रमांक. १ अन्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पीएच.डी अभ्यासक्रमासाठी संशोधन अधिछात्रवृत्ती (फेलोशिप देणे) ही योजना मंजूर करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक. २ अन्वये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे मार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवत्ती मर्यादा १०० वरुन २०० इतकी करण्यात आलेली असून यु.जी.सी (University Grants Commission) मार्फत विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन, मार्गदर्शक तत्वानुसार Date of Award पासून फेलोशिपचा लाभ अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. संदर्भ क्रमांक. ३ अन्वये अनुसूचित जमातीच्या पीएच.डी संशोधन अधिछात्रवृत्ती UGC च्या नियमानुसार सुधारित दराने लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाची मान्यता प्रदान करण्यात आली.

वरील संदर्भ क्रमांक १ ते ३ च्या आधारे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे मार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवत्ती योजनेचे दर दिनांक ०१ एप्रिल २०२१ पासून प्रवेशित २०२१-२२, २०२२-२३ च्या संशोधकांना खालील तपशिलाप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ.क्र | मंजूर दर | सुधारित दर | लागू करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रु ३१,००० प्रतिमाह अधिछात्रवृत्ती | रु. ३७०००/- प्रतिमाह पहिल्या दोन वर्षासाठी (JRF) | दिनांक ०१ जानेवारी २०२३ |
| | | रु.४२०००/- मुल्यांकन अहवाल प्राप्ती नंतर उर्वरित कालावधीसाठी (SRF) | दिनांक ०१ जानेवारी २०२३ |
| २ | घरभाडे भत्ता<br>X वर्गवारी शहरे- २४%<br>Y वर्गवारी शहरे- १६%<br>Z वर्गवारी शहरे- ८% | घरभाडे भत्ता<br>X वर्गवारी शहरे- ३०%<br>Y वर्गवारी शहरे- २०%<br>Z वर्गवारी शहरे- १०% | दिनांक ०१ जानेवारी २०२३ |

दिनांक ०१.०१.२०२३ पासनू उमेदवारांना फरकाची रक्कम अदा करण्यात येईल, त्यानुषंगाने नियमानुसार बंधपत्र (UNDERTAKING) सादर करणे अनिवार्य असेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(डॉ. राजेंद्र भारुड भा. प्र.से)
आयुक्त